धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय/आस्थापना

परिपत्रक क्रमांक ३५८ दिनांक २४/१२ /२०१२

**विषय :- धर्मादाय संघटनेतील गट "ड" मधील कर्मचा-यांबाबतचे शासन सेवेबाबतचे निर्णय घेण्याकरीता धर्मादाय सह आयुक्त यांना प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून नियुक्त करणेबाबत.**

# मार्गदर्शक सूचना

धर्मादाय संघटनेतील गट "ड" मधील सर्व संवर्गातील कर्मचा-यांच्या बिंदू नामावली, सेवाजेष्ठता सूची, पदोन्नती, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, बदली तसेच सरळसेवा भरती याकरीता धर्मादाय सह आयुक्त, पुणे/नाशिक/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ अमरावती/ लातूर/ नागपूर यांना प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून नियुक्त करण्यांत येत आहे.

त्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयातील गट "ड" च्या कर्मचा-यांविषयी उपरोक्त बाबींबाबत योग्य ती कारवाई करावी, तसेच सदर बाबी अंमलात आणताना खालील गोष्टींचे काटेकोरपणे पालन करावे.

१. **बिंदू नामावली** :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र. ६३/९७/१६ ब मंत्रालय, दिनांक १८/१०/१९९७ च्या अनुषंगाने बिंदू नामावली तयार करण्यात यावी.

प्रत्येक प्रादेशिक विभागीय कार्यालय प्रमुखाने त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या कार्यालयातील गट "ड" च्या कर्मचा-यांची सविस्तर माहिती मागविण्यात यावी. माहितीमध्ये कर्मचा-यांचे नांव, पद, नियुक्तीचा/पदोन्नतीचा दिनांक, जात तसेच जात वैधता याची अचूक माहिती नमूद असावी. **सरळसेवा व पदोन्नतीसाठी वेगवेगळी बिंदू नामावली ठेवावी. सरळसेवाकरीता चपराशी/ पहारेकरी/सफाईगार ही पदे घ्यावी व पदोन्नतीकरीता आदेशिकावाहक, नाईक/दप्तरी ही पदे घ्यावीत.**

बिंदू नामावली तयार झाल्यावर प्रथमतः मुख्यालयाकडून पडताळणी करुन घ्यावी व नंतर मागासवर्ग विभागीय आयुक्त यांचेकडून तपासणी करुन घेण्यात यावी.

२. **सेवाजेष्ठता :-** आपल्या अधिनस्त असलेल्या कार्यालयातील कर्मचा-यांची माहिती मागवून ती एकत्रित करावी. **नियुक्तीच्या दिनांकानुसार जेष्ठता सूची तयार करण्यांत यावी**. जेष्ठता सूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे आवश्यक आहे. जेष्ठता सूची तयार करणेकरीता १ जानेवारी हा दिनांक मानन्यात यावा. जेष्ठता सूची तयार करताना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र. २८४/१२ दिनांक २१/१०/२०११ चे अवलोकन करावे.

**आदेशिकावाहक, दप्तरी/नाईक व चपराशी/पहारेकरी/सफाईगार अशी वेगवेगळी पदनिहाय जेष्ठता सूची तयार करावी.**

३. **पदोन्नती :-** गट "ड" च्या मधील कर्मचा-यांना पदोन्नती देतेवेळी जेष्ठता सूची लक्षात घेऊनच त्यानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच मागासवर्गीय कर्मचा-यांकडून जात वैधता प्रमाणपत्र पात्र झाल्याशिवाय पदोन्नती देण्यात येऊ नये.

४. **सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना :-** गट "ड" मधील कर्मचा-यांचे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची प्रकरणे हाताळताना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९५/प्र.क्र. १/९५/ बारा दिनांक ८ जून १९९५ चा शासन निर्णय तसेच त्यास अनुसरुन असलेले इतर शासन निर्णयाचा आधार घ्यावा.

५. **बदली :-** गट "ड" मधील कर्मचा-यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केला जाणार नाही. ते ज्या ठिकाणी काम करीत असतील त्या ठिकाणच्या बाहेर ज्या ठिकाणी त्यांनी बदली करण्याची विनंती केली असेल तेथे निर्बाध रिक्त पद असल्याखेरीज किंवा परस्पर संमतीने बदली मागितली असल्याखेरीज किंवा त्यांच्या विरुध्द गंभीर स्वरुपाची साधार तक्रार असल्याखेरीज त्यांची त्या ठिकाणाहून अन्यत्र बदली करण्यांत येऊ नये.

६. **भरती प्रक्रिया :-** सरळसेवा भरतीने चपराशी/पहारेकरी या संवर्गातील पदे भरताना रिक्त पदांच्या आरक्षणानुसार त्या त्या विभागातील सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवारांची यादी उपलब्ध करुन घ्यावी व त्यातूनच उमेदवाराची निवड करण्यांत यावी.

**गट "ड" मधील कर्मचा-यांविषयी उपरोक्त बाबीं बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्यालयास सादर करावा. प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी घेतलेल्या निर्णयासंबंधी आवश्यक वाटल्यास त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार विभाग प्रमुख म्हणून धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना राहतील .**

**धर्मादाय आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# महाराष्ट्र शासन
# धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
# मुंबई यांचे कार्यालय

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०

फॅक्स २४९७६४२०

Office of the
CHARITY COMMISSIONER
3rd Floor, 83,Dr. Annie Besant Rd,
Worli, Mumbai - 400 018.
Tel No. 24935434 24935490
Fax No. 24976420
E-mail ID cc- mahastate@mahacharity.gov.in
Webside – mahacharity.gov.in

---

संदर्भ क्रमांक आस्था/ 8138/12      26 DEC 2012

प्रति,
धर्मादाय सह आयुक्त,
पुणे/नाशिक/औरंगाबाद/कोल्हापूर
लातूर/अमरावती/नागपूर

विषय :- धर्मादाय संघटनेतील गट "ड" मधील कर्मचा-यांचे शासन सेवेबाबतचे निर्णय घेण्याकरिता धर्मादाय सह आयुक्त, यांना प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून नियुक्त करणेबाबत.

---

परिपत्रक क्रमांक ३५८ दिनांक २४/१२/२०१२

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे परिपत्रक यासोबत पाठविण्यांत येत असून, त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. तसेच गट "ड" मधील कर्मचा-यांची बिंदू नामावली त्वरीत तयार करुन पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करावी, हि विनंती.

सोबत :- वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता

प्रत :- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी
धर्मादा सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई
सहायक धर्मादाय आयुक्त,
सोलापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/
अहमदनगर/ठाणे/रायगड/जळगांव/धुळे/जालना/
परभणी/नांदेड/बीड/उस्मानाबाद/वर्धा/चंद्रपूर/यवतमाळ/गडचिरोली/
भंडारा/अकोला/बुलढाणा/नंदूरबार/हिंगोली/वाशिम/गोंदिया

CO/HQ/M-20/MY DOC/ANITA24/12/12